# <u>अहवाल</u>




**डॉ. एम. एम. मुरुडी**

**प्र. प्राचार्य**

**डॉ. श्यामली सोलंकी**

**समन्वयक**

**डॉ. प्रविणचंद्र गायकवाड**

**सहसमन्वयक**

**शिवस्वराज्यदिन**

**सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई**

**06 जून 2022**

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. 2/विकामुं/तंशि/आस्था-(4)/2022/1976, दिनांक 20 मे 2022 अन्वये, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-2021/प्र.क्र.30/विशि-5, दिनांक 03 जून, 2021 अनुसार 6 जून हा दिवस संपूर्ण राज्यातील अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थंमध्ये "शिवस्वराज्यदिन" म्हणुन साजरा करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यानुसार संस्थेचे मा. प्र. प्राचार्य **डॉ. एम. एम. मुरुडी** यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रथम वर्ष विभागाच्या विभागप्रमुख **डॉ. श्यामली सोलंकी** यांच्या समन्वयाने दिनांक 06 जून 2022 रोजी आमच्या संस्थेत "शिवस्वराज्यदिन" कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचा औपचारिक शुभारंभ मा. प्राचार्य व कृती समिती सदस्याच्या हस्ते दिप-प्रज्वलनाने करण्यात आला. "शिवस्वराज्यदिन" कृती समितीच्या सदस्या **डॉ. मेघा नगराळे** यांनी पुष्पगुच्छ देऊन मा. प्राचार्यांचे यांचे स्वागत केले. मा. प्राचार्यांच्या हस्ते शिवप्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी छत्रपती शिवरायांचे गौरव-गान करणारी शिवगर्जना (गारद/बिरुद) सादर करण्यात आली.







**शिवस्वराज्यदिन**
**सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई**
**06 जून 2022**

संस्थेचे प्राचार्य **डॉ. एम. एम. मुरुडी** यांनी उपस्थित प्राध्यापक वृंद, अधिकारी वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांना छत्रपती शिवरायांचे तेजस्वी व्यक्तिमत्तव व अलौकिक कर्तृत्व या विषयी संबोधित करुन बहुमुल्य मार्गदर्शन केले.




शिक्षक वृंदातर्फे **प्रा. सचिन वनकर** हयांनी "शिवरायांचे व्यवस्थापन कौशल्य" याबाबत आपले वक्तृत्व सादर केले. विद्यार्थ्यातर्फे **मयंक पाटणकर** (प्रथमवर्ष-यांत्रिकी), **ईश्वर निंभोरे (**व्दितीयवर्ष-स्थापत्य), **रुग्वेद निरगुंड** (प्रथमवर्ष-विदयुत) व **प्रतिक कडू** (तृतीयवर्ष-स्थापत्य) हया विद्यार्थ्यांनी शिवरायांचे पराक्रम, राज्याभिषेक सोहळा, निष्कलंक चारित्र्य इत्यादी विषयांबाबत प्रेरणादायक वक्तृत्व केले.





शिवरायांनी गनिमी काव्याने जुल्मी आझलखानाचा प्रतापगडावर वध केला व हिंदवी स्वराज्यावर येऊ घातलेल्या पाशवी, अत्याचारी राजवटीच्या जाचापासून रयतेला मुक्ती मिळवून दिली. हया अभूतपूर्व पराक्रमाचे वर्णन कराणारा शिवस्तुतीवर पोवाडा **कु. वैभवी पाटील** (तृतीयवर्ष-विदयुत) हया विद्यार्थिनीने

सादर केला. संस्थेचे भांडारपाल **श्री. दिनेश तोरणे** यांनी “शूर आम्ही सरदार” हे मर्द मराठा मावळयांच्या मनोबलाचे वर्णन करणारे सुश्राव्य शौर्यगीत गायन सादर केले.





शिवस्वराज्य दिनाच्या हया प्रेरणादायी कार्यक्रमाचे औचित्य साधून कार्यक्रमस्थळी शिवसाहीत्य शिवचरित्र, मराठयांचा इतिहास, शिवशाही इत्यादी विविध विषयांच्या मराठी, इंग्रजी व हिंदीतील सुमारे 100 ग्रंथ व पुस्तकांचे शिवसाहीत्य प्रदर्शन आयोजित केले गेले. उपस्थित शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विशेषत: विद्यार्थीवर्गाने हया प्रदर्शनास भेट दिली व शिवसाहीत्य ग्रंथसंपदेचे अवलोकन केले. या ग्रंथ प्रदर्शनातील काही दुर्लभ व उत्कृष्ट अशा साहित्यरचनेची प्रत संस्थेच्या ग्रंथालयात उपलब्ध व्हावी यासाठी विहीत नमुन्यात शिफारस करण्यात आली. संस्थेचे ग्रंथपाल **श्री. संजय सावंत** हयांनी या ग्रंथप्रदर्शनाच्या आयोजनासाठी कृती समितीला मोलाचे सहकार्य केले.




शिवस्वराज्य दिनाचे निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी शिवराज्याभिषेक “राजा शिवछत्रपती राज्याभिषेक सोहळा” या विषयाची पोष्टर बनविण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेत प्राप्त झालेल्या पोस्टर्समधून **कु. वैभवी कोकाटे** (एम-टेक स्ट्रक्चरल इंजि.) हया विद्यार्थीनीने शिसपेन्सिलचा वापर करुन चित्रित केलेल्या शिवराज्याभिषेक सोहळयाच्या कलात्मक पोस्टरची सर्वोकृष्ट पोस्टरसाठी निवड करण्यात आली. कृती समिती व संस्थेतर्फे कु. वैभवी हिला मा. प्राचार्याच्या हस्ते प्रोत्साहनार्थ रु. 1000/- चे पारितोषिक देण्यात आले.





**शिवस्वराज्यदिन**
**सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई**
**06 जून 2022**

कार्यक्रमास संस्थेतील प्राध्यापक, अधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहूसंख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांतर्फे शिवप्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात येवून उपस्थित प्रत्येक सदस्याने छत्रपती श्री शिवाजी महाराजांना आपली श्रध्दापूर्ण मानवंदना दिली. कृती समितीचे सदस्य व संस्थेचे मराठी भाषा अधिकारी **प्रा. पराग मुळे** हयांनी हया कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व आभारप्रदर्शन व्यक्त केले. सर्व उपस्थितांव्दारे **सामूहिक राष्ट्रगीत गायन** करुन हया मंगलमय व प्रेरणादायी कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमास सर्व उपस्थितांचा मन: पूर्वक व उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला.






**शिवस्वराज्यदिन**

**सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई**

**06 जून 2022**

संस्थेचे मा. प्र. प्राचार्य **डॉ. एम. एम. मुरुडी** हयांच्या मार्गदर्शनात, **डॉ. श्यामली सोंलकी, समन्वयक** व **डॉ. प्रवीणचंद्र गायकवाड, सहसमन्वयक** हयांच्या नेतृत्वाखाली **श्री.प्रविण लोहार, सौ. अनुष्का जाधव** व सर्व कृती समिती सदस्यांचे शिवस्वराज्य दिन यशस्वीरित्या आयोजित करण्यासाठी मोलाचे सहकार्य लाभले. शिवस्वराज्य दिन 2022 कार्यक्रम संस्थेत अतिशय उत्साहात, समारंभपूर्वक व यशस्वीरित्या आयोजित केला गेला.







**शिवस्वराज्यदिन**
**सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई**
**06 जून 2022**